ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.(श्री.अनिल अंकुश भोईटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत अळसुंदे तालुका कर्जत)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र. ९६६६२६३
दिनांक - १६/०९/२०२५

संदर्भ-१.या कार्यालयाचे आदेश क्र.६६६७७५ दिनांक ०८/११/२०२४ (सेवा निलंबन आदेश)
२. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(१)
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(५)
४. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५
५. सेवा निलंबन आढावा समिती मधील सूचना दि.०७.०७.२०२५.

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये,श्री. अनिल अंकुश भोईटे,तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत अळसुंदे तालुका कर्जत यांना कार्यालयीन कामकाजात ग्रामपंचायत अळसुंदे तालुका कर्जत येथे कार्यरत असताना त्यांनी शासनाच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभार्थी विहीर प्रकरण मंजुर करणे व मंजुरी नंतर उर्वरित देयके काढणे कामी लाचेची मागणी करणा-या पंचायत समिती कर्जत कनिष्ठ लेखाधिकारी व रोजगार सेवक यांना पैसे देणेसाठी प्रोत्साहन देणे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.५ मधील चर्चेनुसार व संदर्भ क्रमांक ४ चे शासन निर्णयानुसार श्री.अनिल अंकुश भोईटे सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.अनिल अंकुश भोईटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत अळसुंदे तालुका कर्जत यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती जामखेड येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री. अनिल अंकुश भोईटे,सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी,पंचायत समिती कर्जत यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय,पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद,श्री.अनिल अंकुश भोईटे,सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबधीत खाते प्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१६०६०११६ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:04:09

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. अनिल अंकुश भोईटे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत अळसुंदे तालुका कर्जत. (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती श्रीगोंदा)

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत/श्रीगोंदा यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---जामखेड---

२/- श्री.अनिल अंकुश भोईटे सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.